**श्री दत्तचित्साई सद्गुरुभ्योनमः**

# शके १८५३ च्या पुण्यतिथी उत्सवाचा अहवाल

श्रीसाईलीलाकर्ते महाशय यांसः—

प्रेमपुरःसर कृ. शि. सा. न. वि. वि. शके १८५३ आश्विन शुक्ल १० बुधवार ता. २१–१०–३१ व त्यानंतर ३ दिवसपर्यंत श्रीशैलधी उर्फ शिरडी संस्थानांतील श्रीसमर्थ सद्गुरु साईबाबामहाराज यांच्या पुण्यतिथी उत्सवाचा अहवाल प्रथम अत्यंत नम्रभावें श्रीचरणतामरसीं सादर करून नंतर आपणाकडे पाठवीत आहें. त्यास येत्या श्रीसाईलीलेच्या अंकीं प्रसिद्धी मिळावी अशी नम्र प्रार्थना आहे.

चालू सालच्या उत्सवाची पुण्य व मिष्ट कामगिरी श्री. बाबासाहेब तर्खड, श्री. रा. व. मोरेश्वरराव प्रधान, श्री सुंदरराव नवलकरादि भक्तमंडळींनीं मजकडे दिली होती. ती मी मोठ्या प्रेमानें पतकरली व श्रीसद्गुरुमाउलीच्या कृपेनें ती निर्विघ्नपणें शेवटास गेली.

## बाहेर गांवची पाहुणे मंडळी

उत्सव कार्याकरतां गतसालाप्रमाणें चालू सालीं ठाण्याहून श्रीदेव शिरडी संस्थान ट्रस्टी सहकुटुंब सहपरिवार–दोन चिरंजीव, एक पुतण्या, दोन स्नुषा, मुलगी, अगाऊच ८–१० दिवस शिरडीस येऊन राहिले होते. उत्सवाचे आधले दिवशीं व उत्सव दिवसांत खालीं लिहिल्याप्रमाणें भक्तमंडळी आली होती.

पुणें. श्री. गोपाळराव कुळकर्णी.
,, श्री. आपासाहेब गाडगीळ.
,, श्री. सौ. लक्ष्मीबाई उर्फ वहिनीसाहेब गाडगीळ.
,, श्री. सीताराम कोठीवाले पवार ( गाडगीळसाहेबांचा नोकर )
मुंबई. श्री. हरेराम.
,, श्री. सुंदरराव दीनानाथ नवलकर.
,, श्री. सौ. शांताबाई सुंदरराव नवलकर.
,, श्री. राधाबाई पेंढारकर.

मुंबई. दादरकर पुरंदरे.

" " दादरकर.

" " कुवरजी पारशी.

" " डाक्तर सावे.

" " कीर्तिकर.

" " हरीभाऊ निमकर आचारी.

" " लक्ष्मणराव डांगे आचारी.

दादर—श्री सावंत फौजदारसाहेब सर्व मंडळीसह.

ठाणें—श्रीदेव सहकुटुंब सहपरिवार. ( संस्थान ट्रस्टी )

" " गोखले महालकरीसाहेब पेन्शनर.

वांद्रें— " रघुवीर भास्कर पुरंदरे, मदत खजिनदार.

" " रामचंद्र आतमाराम उर्फ बाबासाहेब नर्वड, संस्थान खजिनदार.

सांताक्रूस " रावबहादुर मोरेश्वर विश्वनाथ प्रधान, ट्रस्टी.

अंधेरी " हरिश्चंद्र मिस्त्री.

पारनेर " गणेश शिवराम पाटणकर, सब रजिस्ट्रार.

नगर श्री. जानकीबाई जटार, एल्. सी. पी. एस्., डाक्टर.

शिरवळ ,, वे. मू. दत्तात्रय पांडुरंग मोने.

नाशिक ,, बाबुराव गाडगीळ, डॉक्टर.

कुडगांव ,, धनराज बापू लोणिया सहकुटुंब सहपरिवार.

गुंतकल ,, अरोळकर सहकुटुंब सहपरिवार.

साकुरली ,, गोविंद कमळाकर दीक्षित.

तांदुळवाडी ,, रामू व नामदेव श्रीविश्रामबोवांचे शिष्य.

सौ. वहिनीसाहेब गाडगीळ ह्या आपल्या सीताराम पवार या नोकरासह अगाऊ दोन तीन दिवस येऊन नेहमींप्रमाणें उत्कृष्ट कामगिरी बजाऊन कोजागरी पौर्णिमा करून दुसरे दिवशीं मोने वगैरे मंडळींसह नगरावरून पुण्यास गेल्या. देवही त्याच दिवशीं पुरंदरेसह मनमाडवरून ठाण्यास

गेले. त्याचे अधले दिवशीं देवांची मंडळी व श्रीमती राधाबाई पेंढारकर ह्या नगरास गेल्या.

कोठीचें काम उत्तम केल्याबद्दल सीताराम पवार यांचे व पाकगृहांत उत्तम व्यवस्था व सुंदर देखरेख ठेवल्याबद्दल व पुण्याहून कांहीं सामान तयार करून आणल्याबद्दल मी सौ. वहिनीसाहेबांचे मन:पूर्वक आभार मानतों.

श्री. बाबासाहेब तर्खड, सुंदरराव नवलकर व रा. ब. मोरेश्वर प्रधान वगैरे मंडळी उत्सव संपण्याचे पूर्वीच कालाभावामुळें निघून गेली.

## कीर्तन

चालू सालीं श्री ह. भ. प. विश्रामबोवा या उत्सवाचे वेळीं नागपूर प्रांतीं पर्जन्यातिवृष्ट्यापत्तींत त्यांच्या सर्व शिष्यांसहवर्तमान सांपडल्यामुळें त्यांना उत्सवास येतां येईना. तथापि त्यांनीं त्याही संकटास तोंड देऊन उत्सव दिवसापूर्वी ते शिष्यांसहवर्तमान खानदेशांत तांदुळवाडीस येऊन पोंचले. आपण उत्सवास येतों अशा खुणेदाखल त्यांनीं २-४ दिवस अगाऊ आपले दोन शिष्य श्री. रामू व श्री. नामदेव यांना शिरडीस पुढें पाठविलें. परंतु पुन: कांहीं अपरिहार्य कार्यामुळें त्यांचें येणें झालें नाहीं.

पुण्यतिथीकरितां ठाण्याचे श्री. देव यांनीं एक आख्यान मुद्दाम तयार करून आणिलें होतें. परंतु त्यांस फार घाई झाली असल्या कारणानें श्री. बापाजी लक्ष्मण कुळकर्णी शिरडीकर यांस तें साधेना. शेवटीं ज्यांनीं आपलें सर्व आयुष्य नोकरींत खर्च केलें, ज्यांना विद्याव्यासंग नाहीं, ज्यांना कवित्व, वक्तृत्व व गायन यांचा गंध नाहीं, ज्यांना सभाधीटपणा म्हणजे काय व व्याख्यान अथवा प्रवचन कसें द्यावें हें कधींही माहीत नाहीं, अशाच ठाण्याच्या देवांचे बुद्धीस श्रीसमर्थ सद्गुरु साईबाबांनीं कृपेनें प्रेरणा करून त्यांना कीर्तनकाराचें सोंग देऊन, आपल्यापुढें उभें करून त्यांचे पुतणे श्री. वसंतराव देव व गांवांतील एकदोन मंडळींच्या साहाय्यानें कसेंबसें कीर्तन करून घेऊन वेळ साजरी करून घेतली. "जेनुं काम तेने थाय बीजो करे तो गोता खाय" या प्रसिद्ध गुजराथी म्हणीप्रमाणें कीर्तन कसें झालें असेल[1] त्याची कल्पना वाचक

[1] कीर्तन अति उत्तम झालें. —संपादक.

करतीलच. असो. मंगळवारीं विजयादशमीचे दिवशीं व गुरुवार व शुक्रवार या दोन दिवशीं मिळून एकंदर तीन दिवस श्री. बापाजी लक्ष्मण कुलकर्णी यांनीं कीर्तन केलें व नेहमीप्रमाणें तीं कीर्तनें चांगलींच झालीं.

## कार्यक्रम

विजयादशमी मंगळवार ता. २०--१०--३१

पहांटे ५ ते ६ सनई चौघडयासह नित्याप्रमाणें काकड आरती.

सकाळीं ६ ते ९ श्रीचे समाधीवर रुद्राभिषेक, व समाधीपुढें सनई चौघडयाची नित्याप्रमाणें हजेरी.

,, ९ ते ११ श्रीचे समाधीस मंगलस्नान, वस्त्रपरिधान, षोडशोपचार पूजा, श्रीच्या प्रधान लेंडी बागेतील पुष्पहार व तुळसी, दूर्वा समर्पण.

,, ११ ते २ श्रीचे समाधीपुढें श्री. बापाजी लक्ष्मण कुळकर्णी यांचें कीर्तन व आरती.

दुपारीं २ ते ३ ब्राह्मण व संस्थान मंडळी व पाहुणे मंडळीचें भोजन.

,, ३ ते ४ श्रीचे समाधीपुढें श्री. नानु पुजारी यांचें नैतिक पुराण.

,, ४ ते ६ सीमोल्लंघन व सायंकाळची आरती.

,, ६ ते ८ रथाची मिरवणूक व गारुड.

सायंकाळीं ८ ते ११ शेजारती व भजन.

अश्विन शु. १०--११ बुधवार ता. २१--१०--३१

पहांटे ५ ते ६ व ६ ते ८ वर प्रमाणें.

सकाळीं ८ ते ९ भिक्षा.

,, ९ ते ११ वर प्रमाणें.

,, ११ ते १ श्री. देव यांचें पुण्यतिथी आख्यान, कीर्तन व आरती..

दुपारीं १ ते २ पुण्यतिथी आराधना विधि.

,, २ ते ४ ब्राह्मणभोजन.

,, ४ ते ५ श्रीचे समाधीपुढें नैतिक पुराण.

दुपारीं ५ ते ६ श्रीशिरडी संस्थान कमिटीची सभा.
,, ६ ते ८ मराठे व इतर मंडळीचें भोजन.
,, ८ ते ११ रथाची मिरवणूक, गारुड, शेजारती व भजन.

आश्विन शु. ११ गुरुवार ता. २२-१०-३१

पहांटे ५-६ व ६ ते ८ व ८ ते ११ वर प्रमाणें.
सकाळीं ११ ते २ आरती, फराळ व भोजन.
दुपारीं ३ ते ५ श्रीचे समाधीपुढें श्री. देव यांचें नैतिक व श्रीज्ञानेश्वरी पुराण.
,, ५ ते ६ शिरडी संस्थान कमिटीची सभा.
सायंकाळीं ६ ते ८ संदल व सायंकाळची आरती.
,, ८ ते ९ चावडी.
रात्रीं ९ ते ११ श्री. बापाजी कुलकर्णी यांचें कीर्तन, शेजारती व भजन.

आश्विन शु. १२ शुक्रवार ता. २३-१०-३१

पहाटे ५ ते ६, ६ ते ८ व ८ ते ११ वर प्रमाणें.
सकाळीं ११ ते २ श्री. बापाजी लक्ष्मण कुळकर्णी यांचें काल्याचें कीर्तन व आरती. दुपारीं २ ते ३ भोजन.
,, ३ ते ५ श्रीचे समाधीपुढें श्री. देव यांचें नैतिक व श्रीज्ञानेश्वरी पुराण.
,, ५ ते ६ सायंकाळची आरती.
,, ६ ते ९ भंडाराभोजन.
रात्रीं ९ ते ११ शेजारती व भजन.

## भोजन पात्रें

मंगळवार नवमीसह विजयादशमीपासून पाहुणेमंडळी येण्यास सुरवात झाली. त्या दिवशीं दोन्ही वेळा मिळून सुमारें १२५ पान झालें. बुधवार दशमी रोजीं दोन्ही वेळा मिळून सुमारें ५०० पान झालें. गुरुवार एकादशी रोजीं दोन्ही वेळां मिळून अजमासें २०० पात्र झालें. शुक्रवार द्वादशी रोजीं दोन्ही वेळां मिळून सुमारें ८०० पान झालें.

रविवार-कोजागरी पौर्णिमा ता. २५-१०-३१

सालमजकुरचे कोजागिरी पौर्णिमेस सौ. वहिनीसाहेब गाडगीळ व श्री. सीताराम पवार हजर असल्यामुळें व सर्व गांवकरी मंडळी हजर असल्यामुळें शिरडीस श्रीचरणाजवळ ही पौर्णिमा थाटाची व यथाशास्त्र झाली. त्या दिवशीं दुपारीं ४ ते ६ पर्यंत श्री. देव यांचें श्रींचें समाधीपुढें नैतिक व श्रीज्ञानेश्वरीचें प्रवचन झालें. तसेंच रात्रीं श्रीची पूजा, दूध, साखर, खडीसाखर, पेढे, नारळ व पोहे यांचा नैवेद्य, सर्व गांवकरी लोकांस प्रसाद वांटून, ब्राम्हणांस दक्षिणा देऊन सर्वांस श्री. देव यांनीं कोजागरीची कथा सांगितली व सर्व मंडळी द्यूत खेळण्यास बसली. पहांटे ३ वाजेपर्यंत खेळणें झाल्यावर सर्व मंडळी आपापले घरीं गेली.

## भोजनाचा बेत

उत्सव दिवसांत भोजनास दोन चटण्या, दोन भाज्या, अमटी, मीठ, लिंबू, भात, वरण, तूप, पांढरी पोळी; दसऱ्याचे दिवशीं श्रींचे नैवेद्यास पंच-पक्वान्नें; पुण्यतिथीचे दिवशीं व भंडारा भोजनास सर्वांस शिरा केला होता. श्री. तात्या पाटील कोते व श्री. बापुराव बोरावके व श्री. माधवराव देशपांडे व संस्थानची सर्व नोकर मंडळी यांना चार दिवसांचें निमंत्रण केलें होतें. शिरा हें पक्वान्न पोटभर होतें व ताक भरपूर होतें.

## भिक्षा

पूर्व पद्धतीस अनुसरून यंदाचे उत्सवांत पुण्यतिथीचे दिवशीं श्रींचे बाबाचा जयघोष करीत व्यवस्थापक मंडळींनीं गांवांत भिक्षा मागितली.

## अभिषेक

सालमजकुरीं श्रींचे आराधनविधीकरितां शिरवळहून ( संस्थान भोर ) मुद्दाम वे. मू. रा. रा. दत्तात्रय पांडुरंग उर्फ बगोबा मोने यांना आणण्यांत आलें होतें. त्यांनीं आराधनाविधि उत्तम प्रकारें पार पाडून श्रींचे समाधीवर रुद्र, लघुरुद्र व पवमान लघुरुद्र केले.

## फुलबाग

रावबहादुर मोरेश्वर विश्वनाथ प्रधान राहाणार सांताक्रुझ यांनीं लेंडीची जागा विकत घेऊन श्रींच्या फुलबागेकरतां अर्पण करून सर्व भक्तमंडळींच्या

तुलसी-फुलांची तक्रार कायमची दूर करून श्रीसमर्थ सद्गुरु साईबाबांची उत्तम प्रकारची सेवा करून आपलें नांव अजरामर करून ठेविलें आहे. बागेंत आतां बहुतेक सर्व प्रकारचीं फुलें होत असून महाराजांचे समाधीवर दररोज फुलांची व तुलसीपत्रांची रेलचेल असते. या सर्व कृत्याचें श्रेय रावबहादुर यांना आहे हें निराळें सांगणें नकोच. श्रीसाइमाउली त्यांचें सहकुटुंब कल्याण करो अशी तिचेच पुण्यचरणीं नम्र प्रार्थना आहे. बागेची व्यवस्था चांगल्या प्रकारें ठेवीत असल्याबद्दल श्री. सगुणराव यांची संस्थानकमिटी आभारी आहे.

याच बागेंतील फुलांचे हार व शेरे श्रींचे उत्सवांत श्रींचे समाधीवर रोज समर्पण होत असत व कित्येक भक्त बागेंतील फुलांचे हार विकत घेऊन श्रींचे समाधीवर प्रेमानें घालीत असत व बागेकरितां जागा देणाऱ्या सद्भक्तांचें अभीष्टचिंतन करीत असत. या फुलबागेमुळें शिरडी गांवास एक प्रकारची अपूर्व शोभा आली आहे. याच बागेंत महाराजांनी खणलेली एक लहानशी पायऱ्यांची विहीर आहे. तिच्यांत पाणी भरपूर आहे व तें फार गोड आहे. त्या विहिरीवर संस्थानकमिटीनें एक रहाट बसविला आहे त्यामुळें सर्व बागेस पाणी मनमुराद मिळतें.

## श्रीसंत भाऊराव कुंभार

या उत्सवांत भाऊराव कुंभार हे भोजनास येत असत. त्यांनीं मागितल्या-प्रमाणें त्यांना दक्षिणा व वस्त्रें देण्यात आलीं. ते पुराणासही कधीं कधीं येऊन बसत व मधून मधून कांहीं उपदेशामृतही मंडळीस पाजीत. त्यांची वृत्ति संतांना साजेशीच आहे. ते निरीच्छ व वैराग्यशील आहेत. ते कशाचाही परिग्रह करीत नाहींत.

## आभार

या सर्व उत्सवकार्यांत श्री. माधवराव बळवंत देशपांडे, त्यांचे दोन्ही चिरंजीव, सुशील स्नुषा, सौ. राधाबाई, श्री. तात्या पाटील कोते श्री. रघुवीर भास्कर पुरंदरे, श्री. सौ. वहिनीसाहेब गाडगीळ, श्री. सीताराम पवार, श्री. बाळ भिलाजी गुरव व संस्थानची इतर नोकर चाकर मंडळी, यांनीं हरएक प्रकारें

मेहनत घेऊन उत्सवकार्यक्रम निर्विघ्नपणें पार पाडला व श्री. बापाजी लक्ष्मण कुलकर्णी यांनीं तीन दिवस कीर्तन करून उत्सवास जी शोभा आणिली त्याबद्दल या उत्सवाचे व्यवस्थापक सर्वांचे अत्यंत आभारी आहेत.

यंदाचे उत्सवांत काम करणाऱ्या बहुतेक मंडळींस वस्त्ररूपानें व द्रव्य-रूपानें देणग्या दिल्या आहेत, त्यांचीं नांवें सोबतचे हिशेबांत दिलीं आहेत.

सोबत हिशोबाची यादी जोडली आहे. तसेंच ज्या सद्भक्तांकडून या उत्सव-कार्याकरतां वर्गणी आली त्यांची नांवनिशीवार व रक्कमवार यादी दिली आहे.

याप्रमाणें साद्यंत विस्तृत व तपशिलवार अहवाल श्रींचरणीं नम्रता व अत्यादरपूर्वक सादर केला आहे. त्यांत चूकभूल असेल त्याची माफी करण्यास श्रीचरणीं सविनय प्रार्थना आहे. उत्सवास आलेल्या सर्व भक्तजनांवर तसेंच ज्यांनीं व इतर भक्तमंडळींनीं उत्सवास हजर न राहतां परभारें मनिआर्डरी पाठवून किंवा अन्य प्रकारें जी द्रव्यद्वारा व शरीरद्वारा मदत केली त्यांवर श्री अखंड कृपा करतील अशी मला बळवती आशा आहे. या उत्सव-कार्यांत ज्या माणसाच्या हातून जाणून किंवा न जाणून चुका झाल्या असतील त्यांची माफी करण्याबद्दल माझी श्रीचरणीं अनन्यभावें प्रार्थना आहे. या अज्ञान व मतिहीन बालकाकडून दरसाल याचप्रमाणें सेवा घेत जावी अशी श्रींच्या दिव्य व पुण्य पदपंकजीं अंतःकरणपूर्वक शेवटची विज्ञप्ति आहे.

शिरवळ,
गुरुवार, आश्विन कृ. १०,
शके १८५३.

श्रीचरणरजदासानुदास,
**बाळकृष्ण विश्वनाथ देव,**
व्यवस्थापक विश्वस्त.

# शके १८५३च्या श्रीसमर्थ सद्गुरु साईबाबा महाराजांच्या पुण्यतिथी उत्सवाचा जमाखर्च.

## जमा

| रु. आ. पै. | |
|---|---|
| ०-०-० | गेले सालच्या पुण्यतिथी उत्सवाची शिल्लक. |
| ४०३-८-० | श्री. बाबासाहेब तर्खड, शिरडी संस्थान खजिनदार यांजकडून उत्सव कार्यासाठीं खर्चाकरितां घेतलेली अगाऊ रक्कम. |
| ७६०-१३-३ | उत्सवकार्यासाठीं ठिकठिकाणाहून आलेली वर्गणी. |
| ४०६-०-३ | श्री. बाबासाहेब तर्खड मार्फत. |
| २०७-०-० | श्री. सुंदरराव नवलकर मार्फत. |
| १८-४-० | श्री. दत्त. मार्फत. |
| ६३-५-० | श्री. बापूराव बोरावके. मार्फत. |
| ९-४-० | श्री. रघुवीर पुरंदरे. मार्फत. |
| ७६०-१३-३ | |

## खर्च.

| रु. आ. पै. | |
|---|---|
| ४-४-६ | चहा. |
| ३८-०-० | तांदुळ भाडेखर्चासह. |
| ५६-१५-९ | तूप. |
| १३-३-० | तेल गोडें. |
| १४-८-० | साखर. |
| २५-४-३ | गूळ. |
| १०-१-९ | गव्हाचा रवा. |
| १२-०-० | गहूं. |
| ६-२-० | तुरीची डाळ. |
| २-६-० | चण्याची डाळ. |
| ३-०-० | चण्याच्या डाळीचें पीठ. |
| ०-१२-० | खोबरें. |
| १-८-० | मीठ. |
| १-४-० | तांबडें तिखट. |
| १-२-० | मसाला. |
| ०-६-० | हिंग. |
| ०-१०-० | हळद. |
| ०-१-० | मोहरी. |
| ०-७-० | चिंच, अमसुलें, हिरवी मिरची. |
| ०-२-० | जिरें. |
| ८-८-० | बटाटे. |
| ०-१०-० | डांगर, गवारी. |
| ०-३-० | लिंबें. |
| ३५-१४-३ | दूध कोजागिरीसह. |
| १-३-० | नारळ. |

| रु. आ. पै. | |
|---|---|
| ११–५–९ | भिक्षेचें उत्पन्न. |
| | ८–२–० रोख. |
| | २–०–६ गहूं. |
| | ०–१२–० तांदूळ. |
| | ०–३–९ बाजरी. |
| | ०–१–६ ज्वारी. |
| | ०–२–० नारळ. |
| | ११–५–९ |
| ३०–१४–६ | उत्सव दिवसांतील दोन्ही पेटयांचें उत्पन्न. |
| | २७–६–३ मंदीर-पेटी. |
| | ३–८–३ मशीद-पेटी. |
| | ३०–१४–६ |
| १८–१५–६ | शिल्लक राहिलेल्या सामानाच्या विक्रीचें उत्पन्न. |
| २५–०–० | श्री. बाबासाहेब तर्खड. यांजकडून श्री. पुरंदरे यांनीं पुण्यतिथी उत्सवाचे खर्चांकरितां अगाऊ घेतलेली रक्कम. |
| ३०–०–० | श्री. बबासाहेब तर्खड यांनीं प्रसादाचें सामान व पिशव्या व पोस्टेज व निमंत्रणपत्रिका छपाई वगैरे कामाकरितां खर्च केलेली रक्कम. |
| २–११–९ | श्री. बाबासाहेब तर्खड यांनीं श्रीचे निशाणाकरितां पाठविलेल्या कापडाची किंमत. |

| रु. आ. पै. | |
|---|---|
| २–१–० | केशर. |
| ०–७–६ | खडीसाखर. |
| ०–४–० | वेलदोडे. |
| ०–१२–० | बदाम. |
| ०–४–० | विडयाचीं पानें. |
| ०–९–० | सुपारी. |
| ०–९–६ | लवंगा. |
| ०–२–३ | कात. |
| ३–६–० | भगर. |
| २–९–६ | शेंगादाणे. |
| १–२–० | साबूदाणे. |
| ५–४–० | पत्रावळी. |
| २–८–० | द्रोण. |
| ८–०–० | सरपण. |
| ७–०–० | घासलेट. |
| ०–३–० | केरसुण्या. |
| ०–३–० | चावडीत चिकटविण्याकरितां बेगडी कागद. |
| ३–०–० | श्रीचे नैवेद्यास पेढे. |
| १–८–६ | ,, ,, पोहे लाह्या. |
| ८–१२–० | पुण्यतिथी आराधन विधीचे वेळ' दक्षिणा. |
| ६–८–० | लघुरुद्राभिषेक दक्षिणा. |
| ५–८–० | पवमानाभिषेक लघुरुद्र दक्षिणा. |
| ६–४–० | आराधनविधीस ५ धोतरांचीं पानें. |
| ८–४–० | आराधनविधि चालविणारे ब्राह्मणास येण्या-जाण्याचा खर्च. |
| १५–०–० | श्री. बापाजी लक्ष्मण कुळकर्णी यांनीं ३ दिवस कीर्तन केलें त्याबद्दल त्यांचे मंदिरास मदत. |

| रु. आ. पै. | | रु. आ. पै. | |
|---|---|---|---|
| ३४–१३–६ | श्री. सुंदरराव नवलकर सेक्रेटरी यांनीं पुण्यतिथी करितां खर्च केलेल्या रकमा. | २–४–९ | भोजन दक्षिणा. |
| १०–०–० | श्री. हरीभाऊ आचारी व डांगे यांस मुंबईहून जातेवेळीं रेल्वे भाड्यासाठीं दिलेली रक्कम. | ८–१३–० | पुण्यतिथीचे दिवसांत संस्थानांतून घेतलेल्या सामानाची किंमत. |
| २४–१३–६ | पुण्यतिथीकरितां अत्तर व सुवासिक तेल, निमंत्रण पत्रिकेकरितां लिफाफे, तिकिटें, लेबलें याकरितां केलेला खर्च. | १–०–० | श्रीचे शामसुंदर अश्वास विजयादशमीस ओंवाळणी. |
| | | १–१५–० | अत्तर व सुवासिक तेल. |
| ३४-१३-६ | | २२–४–६ | निमंत्रणपत्रिकेकरितां पाकिटें, तिकिटें व लेबलें. |
| | | ३–०–० | पितळी बकेट. |
| | | २१–३–६ | रेल्वे खर्च. |
| | | ९–१३–० | मोटार खर्च. |
| | | २–८–० | टांगा खर्च. |
| | | ४–११–० | बैलगाडी खर्च. |
| | | २–८–० | तराफा खर्च. |
| | | ४–११–० | हमाली खर्च. |
| | | ७–८–० | पाणी भरण्याची मजुरी. |
| | | १०–११–६ | मोलकरीणीची धुण्याची व भांडीं घासण्याची मजुरी. |
| | | १–०–० | लक्ष्मण सुतार यास किरकोळ मोडतोड दुरुस्तीची मजुरी. |
| | | २–४–० | दळण मजुरी. |
| | | २–०–० | भंडारा, भोजन तयार करण्याची मजुरी. |
| | | ६८–०–० | अचारी मजुरी. |
| | | ०–८–० | फर्शी धुण्याकरितां कापड. |
| | | २–११–९ | श्रीचे निशाणाकरितां कापड. |
| एकंदर जमा १३१८–२–३ | | २–९–० | निमंत्रणपत्रिका छाईप खर्च. |
| | | २८–७–९ | प्रसाद पाठविण्याचा खर्च |

| रु. आ. पै. | |
|---|---|
| २–१२–० | पिशव्यासाठीं कापड |
| १–८–० | पिशव्यांची शिलाई. |
| ३–१२–० | साखर. |
| ०–१०–० | सुंठ,वेलदोडे. |
| १८–१३–० | पोस्टेज. तिकिटें. |
| १–०–९ | मागाहून. |
| २८–७–९ | |
| ५१–१–० | कपडे वाटले. बाळा चोपदार. नाना चोपदार.अहिल्या. माणिक. तासेवाला. अबदागिरवाला. गटू शिंदे. पालखीवाले असामी ४:–आण्णा, भिक्या, रुंजा व त्याच भाऊ, अबदुलभाई. बाबू अजाचा. श्रीसंत भाऊराव कुंभार. यांना धोतरजोडे, धोतरांचीं पानें, कफन्या, लंगोटया, कुडतीं, बंड्या, पासोडी वगैरे. जानक्या महार यास धोतर पान. |
| २–०–० | सिताराम पोवार पोस्त. |
| १–८–० | नाना चोपदार ,, |
| ३–०–० | उद्धव देशपांडे ,, |
| १–०–० | श्रीसंत भाऊराव कुंभा यांस दक्षिणा. |
| ११–०–० | श्री विश्रामबोवांचे दोन मुलांस. |
| ४–८–९ | किरकोळ. |
| ६१३–२–३ | |

| रु. आ. पै. | |
|---|---|
| ४०३–८–० | श्री बाबासाहेब तर्खड यांजकडून खर्चाकरितां श्री. देव यांनीं घेतलेली अगाऊ रक्कम परत. |
| २५–०–० | श्री. बाबासाहेब तर्खड यांजकडून श्री. पुरंदरे यांनीं पुण्यतिथी खर्चाकरितां अगाऊ घेतलेली रक्कम. परत. |
| ३०–०–० | श्री. बाबासाहेब तर्खड यांनीं प्रसाद पाठविण्यासाठीं कापड, इतर जिन्नस व तिकिटें, पाकिटें आणण्याकरितां खर्च केलेली रक्कम परत. |
| ३४–१३–६ | श्री. सुंदरराव नवलकर सेक्रेटरी यांनीं अत्तरें, तेलें, निमंत्रणपत्रिकाकरितां व कार्ड पाकिटें, लिफाफे, लेबलें, वगैरेंकरितां खर्च केलेली रक्कम परत. |
| ११०६–७–९ | |
| २११–१०–६ | कायम निधींत टाकणें श्री शिल्लक करितां श्री. बाबासाहेब तर्खड यांजकडे दिली. |
| १३१८–२–३ | |

शिरवळ, संस्थान भोर, गुरुवार,
अश्विन कृष्ण १०, शके १८५३.
प्रजापति नाम संवत्सरे,
तारीख ५ नवंबर सन १९३१.

**बाळकृष्ण विश्वनाथ देव,**
पुण्यतिथी उत्सव व्यवस्थापक विश्वस्त.

# सिंहावलोकन

सुमारें नऊ वर्षांमागें एके रविवारीं सकाळीं, आपल्या श्रीसाई सच्च-रिताच्या अध्यायांचें एक हस्तलिखित बाड घेऊन कै. श्री. गो. र. दाभोळकर, सेवकाकडे आले होते.

त्यांतले प्रथमचे एक दोन अध्याय वाचतांना लेखकाला ते इतके गोड वाटलें कीं, सर्व अध्याय छापवून प्रसिद्ध करण्याची श्री. दाभोळकरांना त्यानें विनंति केली. एकदम प्रसिद्ध झाल्यास जनतेला तो ग्रंथ पसंत पडेल किंवा कसें आणि त्यामुळें आंगावर विनाकारण खर्च पडेल, कीं काय याविषयीं ते साशंक असल्यामुळें एक मासिक चालू करावें असेंही त्यांना सुचविलें होतें.

त्यांनीं कै. हरि सीताराम ऊर्फ भाऊसाहेब दीक्षित यांची सल्ला घेतली. सहा महिने झाले तरी कांहींही होत नाहीं असें पाहून खंती न होतां, एके दिवशीं कै. दाभोळकर व दीक्षित श्रीसमर्थांच्या कायम निधीच्या योजनें-संबंधीं विचार करण्यासाठीं लेखकाच्या घरीं आले असतां, इतर सर्व मार्ग बाजूला ठेवून उत्तम मार्ग म्हणजे श्रींच्या पायांपाशीं बसून जे अपूर्व प्रसंग अनुभविण्यांत आले, त्यांचें द्योतक, म्हणजे या कांहीं भाकडकथा नव्हत, अत्यंत आश्चर्यकारक तर खऱ्याच, व आमच्या प्रत्येकाच्या अंतःकरणास योग्य तो मार्ग दाखवून, आत्मविश्वास वाढावा याच हेतूनें घडण्यांत आल्या आहेत, म्हणून, श्रीसमर्थ साईबाबांच्या लीला एका मासिकाच्या रूपानें प्रसिद्ध होऊन, खर्चवेच जाऊन बाकीच्या व्यय श्रींच्या कायम निधीकडे व्हावा, हें त्यानें आग्रहानें सुचविलें, आणि तें त्यांना पसंत पडलें.

पांचशें रुपयांची रक्कम त्यांच्या स्वाधीन करण्यांत आली आणि श्रीसाईलीला हें मासिक प्रसिद्ध होऊं लागलें.

पहिल्या प्रथम ९५० वर्गणीदार मिळून श्रींची लीला इतकी लोकप्रिय झाली कीं पहिल्याच अंकाचें पुनर्मुद्रण आणखी १००० प्रतींचें झालें. श्री साईलीलेची मालकी सेवकाकडे ठेवण्यांत आली.

श्रीसाई भक्तांचे गोड अनुभव प्रसिद्ध होऊं लागले. कै. दीक्षित हयात असेपर्यंत ते स्वतः अनुभव तपासून प्रसिद्ध करवीत असत.

त्यांच्या मृत्युनंतर श्रीसाईलीलेचे अंक वेळेवर प्रसिद्ध होईनात. ते इतके कीं, कै. दाभोळकरांच्या निधनाच्या वेळीं ते बहुतेक एक वर्ष मागें पडले होते.

या सर्व कारणांमुळें पूर्वीच्या ९५० च्या संख्येवरून कै. दाभोळकरांच्या मृत्युदिनापर्यंत वर्गणीदारांची संख्या घटून ४०० च्या आंत आली.

त्यांच्या मृत्यूमुळें सर्व प्रकारची जबाबदारी लेखकाच्या आंगावर पडली. लेखकाला स्वतःला प्रसिद्धीचा तिटकारा, आणि कोना कोपऱ्यांत राहावयाची हौस असल्यामुळें जेव्हां श्रीसाईलीलेचें सर्व प्रकारचें चालकत्व त्याच्यावर पडलें तेव्हां तो स्वाभाविक रीतीनें गोंधळून गेला, तेव्हां प्रधान व देवादि शुभेच्छु मंडळीनें त्याला धीर दिला.

आज लगबग सत्तर वर्षांची उमर असूनही संसारसंगोपनार्थ त्याला नोकरी करावी लागत आहे, आणि ती देखील बरीच जबाबदारीची आहे. त्यांतल्या त्यांत संस्थान कमिटीनें संस्थानच्या खजीनदारीचें काम पण निर्दय-पणानें त्याच्या माथीं मारलें आहे.

हीं सर्व कामें केवळ श्रींच्याच कृपेनें चाललीं आहेत अशी त्याची पूर्ण खात्री आहे.

" मुकं करोति वाचालं " या वाक्याची पूर्ण प्रचीति घेऊन या अत्यंत अज्ञानी व दीन मजूरास ज्या ममतेनें, सहनशीलतेनें व प्रेमानें आज तीन वर्षें श्रीसाईलीलेच्या वर्गणीदारांनीं संभाळून घेतलें आहे त्या त्यांच्या कृतीचें श्रेय तो त्या साक्षात् प्रेममूर्ति श्रीसाई माउलीलाच सर्वस्वीं अर्पण करीत आहे.

इतक्या विस्तारानें लिहिण्याचें मुख्य प्रयोजन हेंच कीं, या सर्व कारणामुळें श्रीसाईलीलेच्या वर्गणीदारांची संख्या घटत घटत ती २५० पर्यंत

आली आहे; त्यामुळें छापण्याचा व टपाल वगैरे सर्व खर्च वाद जातां, दोन अडीचशें रुपये पदरचे खर्च होत आहेत, आणि त्यामुळें श्रींच्या कायम निधीला मदत होण्याचें तर दूरच आहे. तर ही सर्व स्थिति अवलोकनांत घेऊन प्रत्येक भक्तानें श्रीसाईलीला ही माझ्यासाठींच आहे, माझीच आहे, या आपुलकीच्या भावनेनें पूर्ण प्रेरित होऊन आणखी जिज्ञासु वर्गणीदार मिळवून देऊन, श्रींच्या कायमनिधीला हातभार लावण्याचें श्रेय घेऊन, या संस्थेला ऋणी करावें.

सर्व भक्तांचा चरणरज.

**रा. आ. तर्खड.**

**ता. क.**—श्रीसाईलीलेचें नववें वर्ष येत्या चैत्र शुद्ध प्रतिपदेला सुरू होईल. तरी त्यापूर्वी सवडीनुसार आपआपली वर्गणी रु. ३—६ मनिऑर्डरीनें पाठवून दिल्यास V. P. करण्याचें प्रयोजन पडणार नाहीं; V. P. फक्त तीन दिवस टपालखातें राखते, आणि त्या तीन दिवसांत कांहीं अपरिहार्य कारणामुळें वर्गणीदाराला ती स्वीकारितां आली नाहीं तर ती परत येते आणि लीलेला एक वर्गणीदार आंचवतो, अशी वस्तुस्थिति होत असते, म्हणून ही अत्यंत आदरपूर्वक नम्र विनंति करण्यांत येत आहे. क्षमा असावी.

**—संपादक.**

# वर्गणीदारांकरितां

१ श्रीसाईलीलेचा वर्षारंभ चैत्र महिन्याचे अंकापासून आहे. नवीन वर्गणीदारांस वर्षारंभापासून अंक घ्यावे लागतील.

२ पत्ता बदलणें झाल्यास लगेच आम्हांस कळवावें. बदललेला पत्ता न कळविल्यामुळें कित्येक वेळां अंक गहाळ होतात.

३ अंकासंबंधीं पत्रव्यवहार आमचेकडे करावा.

४ लेखासंबंधीं पत्रव्यवहार संपादक व प्रकाशकांकडे करावा.

# वार्षिक वर्गणी.

वार्षिक वर्गणी टपाल खर्चासह मनिऑर्डरनें अगाऊ रु. ३।=, व्ही. पी. नें रु. ३॥, फुटकळ अंक ।= मागील अंकास शिल्लक असल्यास -॥-

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला.**

# लेखकांकरितां

१. श्रीसाईलीलेंत प्रसिद्धीसाठीं पाठविलेला लेख अथवा कविता कागदाच्या एका बाजूवर,मार्जिन सोडून,सुवाच्य बालबोध लिपींत असावीं. पेन्सिलीनें किंवा कागदाचे दोन्हीं बाजूस लिहिलेला मजकूर छापण्यास फार त्रास पडतो.

२. लिखाणासोबत पूर्ण नांव व पत्ता दिला पाहिजे. नांव प्रसिद्ध न करितां टोपण नांवाखालीं प्रसिद्धि द्यावयाची असल्यास त्याप्रमाणें कळवावें.

३. लेख अथवा कविता हातीं आल्यानंतर १ महिन्यांत पसंति अगर नापसंति कळविली जाईल. पसंति कळविल्यानंतर, आम्हांला कळविल्याशिवाय लेखकांना तो मजकूर दुसरीकडे छापविण्यास देऊं नये.

४. लेखांत योग्य तो फेरफार करण्याचा अधिकार आमचेकडे राहील. येईल तसा शब्दशः प्रसिद्ध करण्याची हमी आम्हीं घेत नाहीं.

५. लेखासोबत पुरेसें पोस्टेज आल्यास, नापसंत लेख परत करूं.

प्रकाशक—**श्रीसाईलीला.**

श्री साईनाथ प्रसन्न

# श्री साईलीला

## मासिक

वर्ष १८ ] शके १८६३ आश्विन, कार्तिक, मार्गशीर्ष, पौष, [ अंक ७-८-९--१०


नाना बाबा, किती किती मत केले रे लोक बाबा ॥

नाना मार्गी कितीतरी भेद किती काढे अजाला ॥




वाहिल्या खूळ तरुण जा त्या न त्या नवाला ॥

यमगृही जाण्याची जबाला ॥

व वर्गणी आहों.

नलिनीदलगतजलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशयचपलम् ।
क्षणमपि सज्जनसंगतिरेका भवति भवार्णवतरणे नौका ॥ (१०)

—शंकराचार्य


संपादकः—रामचंद्र वासुदेव धैसास


३२

# अनुक्रमणिका

१ संपादकीय
२ श्रीसाईगाथामृत
३ शिरडीवृत्त
४ जीर्णोद्धार अहवाल
५ उदीचा अनुभव
६ साईभक्तांस सूचना
७ रूल्स्
८ अडेंडा कॉरिजेंडा
९ डिस्क्लेमर

## श्री साईभक्तांस विनंती.

साईलीलेचें वर्ष चैत्र महिन्यापासून सुरू होते. तरी अंक सुरू करणें झाल्यास चैत्रापासून वर्गणीदार झालें पाहिजे.

भक्तांनीं आपले अनुभव श्री साईलीलेंत प्रसिद्ध करण्याकरितां कृपा करून खालील त्यावर पाठवावेत. आपलें नांव प्रसिद्ध होणें नको असेल त्यांनीं आपलें टोपण नांव व पला पत्ता कळवावा म्हणजे तशी व्यवस्था होईल.

पुष्कळ भक्तमंडळींच्या पत्त्यांत फेरफार झाल्यामुळें त्यांना पोस्टांतून पाठविलेल्या उत्सवाच्या निमंत्रणपत्रिका व प्रसाद न पोचतां परत येतात. तरी कृपा करून त्यांनीं आपले पत्ते बदलले असल्यास ऑ. चिटणीस रा. रा. श्री. ना. खारकर, ३७ करई ..र्णे यांजकडे कळवावें.

## वर्गणीदारांस विनंती.

...नीं चालू सालची म्हणजे शके १८६३ ची २ रु. ४ आणे अद्याप पाठविली ...नीं कृपा करून ती खालील पत्त्यावर मनिऑर्डरीनें पाठवून द्यावी. अथवा ...याचें सुचवावें, म्हणजे २ रु. ७ आ. ची व्ही. पी. करण्यांत येईल.

रा. वा. घैसास,
सम्पादक,
लो. टिळक ज्युबिली ट्रस्ट बिल्डिंग नं. २
गोखले रोड नॉर्थ, दादर, मुंबई नं. १४



गोदावर्याः प्रवाहो विलसति यदुदक्पार्श्वतो योजनैकम् ॥
प्रादुर्भूत्वाऽत्मभूत्याऽनिशजनितमहे शीलधिक्षेत्रधम्नि ॥
सर्वज्ञातीयवृंदैर्विविधजनपदादागतैः स्तूयमानः ।
पूर्णब्रह्मेव साक्षाद्विजयति भुवनं पावयन्साइनाथः ॥

शके १८६३ ) श्रीसद्गुरु साईनाथ वर्ष १८ अंक ७-८-९-१०
आश्विन-कार्तिक-
मार्गशीर्ष पौष

## संपादकीय

शिर्डी संस्थानचा कारभार एप्रिल ते मार्च किंवा चैत्र ते फाल्गुन असा चालत असे पण संस्थान कमिटीनें यंदापासून संस्थानचा कारभार जानेवारी ते डिसेंबर असा चालू केला आहे. अर्थात त्याच्याच आश्रयानें असलेल्या साई-लीलेला सुद्धां आपले वर्ष बदलावे लागले.

साईलीलेचे अठरावें वर्ष एप्रिल ते डिसेंबर असें दहा महिन्यातच संपवावे लागले. म्हणून ज्या साईलीलेच्या वर्गणीदारांकडून अद्याप वर्गणी येणें आहे त्यांजकडे तीसऱ्या जोड अंकापर्यंतचीच व्ही. पी. करीत आहों. व ज्या वर्गणी दारांकडून-नवे व जुने शके १८६३ (इ. स. १९४१-४२) ची वर्गणी आली आहे, त्यांची चालू सालाची जानेवारी ते मार्च या जोड अंकाची किंमत आठ आणे कमी घेतली जाईल.

# अभिप्राय.

## Light on the Path of Self Realization.

Compiled by an Admirer and published by Mr N. V. Gunaji, B A, L L B Belgaum. Pages More than 400 Superbly and nicely bound. Price Rs. three only. Can be had from- the Popular Book Depot, Lamington Road, Bombay 7.

'साक्षात्कार मार्ग प्रदीप' हा नुकताच प्रसिद्ध झालेला इंग्रजी ग्रंथ अपूर्व आहे. यांत आरंभी श्रीयुत ना. वा. गुणाजी यांनीं प्रस्तावनेत, नाथपंथा-विषयीं अपूर्व व दुर्मिळ माहिती, नाथपंथ व वारकरी पंथ यांचा संबंध, नाथपंथीय श्रीगजानन महाराज, यांचे त्रोटक चरित्र इत्यादि विवेचन केलेलें आहे. तसेंच सुप्रसिद्ध नामभक्त, श्री गुरुचरित्र संशोधनकर्ते वेदांती लेखक ह. भ.प. रामचंद्र कृष्ण कामत यांनीं आपल्या पुस्तकांत गुरुशिष्यांची लक्षणें, बारातऱ्हांचे गुरु, बुवाबाजी, श्री गजानन महाराज, नाशिक यांचे वैशिष्ठ व इतर उपयुक्त मुद्दे याविषयीं मुद्देसुद माहिती दिलेली आहे. श्री गजानन महाराज यांचे उपदेशाप्रमाणें अष्टांग योगाविषयीं, विशेषतः त्यांच्या त्यांच्या ध्यानयोगाविषयीं थोडक्यांत वर्णन या ग्रंथांत दिलेलें आहे. श्रीगजानन महाराज यांचे विस्तृत चरित्रहि देण्यांत आलेलें आहे. 'तुटे वाद संवादतो हितकारी' असे कांहीं थोडे संवाद यांत दिलेले आहेत या ग्रंथांतील मुख्य भाग म्हणजे श्री. गजानन महाराज यांच्या ज्या अनेक शिष्यांना व भक्तांना जे कांहीं प्रत्यय आले त्यापैकीं ३६ जणांनी आपले अनुभव स्वतांच्या सही निशी लिहून दिलेले या ग्रंथांत प्रसिद्ध केलेले आहेत. यांतील माहिती तर फार उपयुक्त व बहुमोल आहे. षडचक्रें व त्यांचें भेदन, कुंडलिनी उत्थापन व सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे आत्मसाक्षात्कार यांविषयींची ह्यात आलेली माहिती सर्वांना विशेषतः मुमुक्षु साधक भक्तांना फारच मनोरंजक व उपयोगी होईल यांत शंका नाहीं. या सर्व गोष्टींमुळे सदरहु ग्रंथ संग्रहणीय व पठणीय झाला आहे यांत शंका नाहीं. ग्रंथाच्या अंतरंगाप्रमाणें बहिरंगाहि सुंदर झालेलें आहे, ग्रंथाची पानें ४०० वर असून किंमत अवघी तीन रुपये आहे. पॉप्युलर डेपो, लॅमिंटन रोड, मुंबई नं. ७, यांचेकडे हा ग्रंथ मिळतो.

—संपादक, श्रीसाईलीला.

५८

# श्रीसाईगाथामृत

## प्रकरण ६ वें

### भक्तावतंस नाना.

( नारायण गोविंद उर्फ नानासाहेब चांदोरकर )

जन्म १८६० इसवी – निधन १९२१ इसवी.

जया परमार्थी खरी गोडी । तयांची साईस मोठी आवडी ॥
चालनि सर्व तयांची सांकडीं । स्वानंद जोडी दे तयां ॥

– श्रीसाईसच्चरित ४१ - ७४

नाना परम भाग्यशाली । साईची अनन्य सेवा फळली ॥

-- श्रीसाईसच्चरित्र ७ - ११२

मागील प्रकरणांत त्रिकुट भक्तांपैकीं अण्णांची - हेमाडपंतांची हकीकत सांगीतली. आतां त्यांपैकीं भक्तावतंस नानाची नानासाहेब चांदोरकरांची हकीकत सांगायावची आहे.

**नानांची कामागिरी.** नानासाहेब इ. स. १८९२ पासून श्रीसांईबाबांकडे जाऊ लागले आणि श्रीबाबांच्या समाधीपर्यंत (१९१८ सालपर्यंत) त्यांचे शिरडीस येणें जाणें असे आणि श्रीबाबांशीं त्याचा संबंध अति जिव्हाळ्याचा असे. ह्या सर्व अवधींत म्हणजे सुमारें २५ । २६ वर्षे बाबांचे निरूपमेय प्रेम नानासाहेबावर असे आणि नानासाहेबाची अनन्य श्रद्धा बाबांवर असे आणि त्यांनीं बाबांची निष्काम सेवा अति उत्तम तऱ्हेनें केली. विशेषत: दोन गोष्टींमुळें नानासाहेब बाबांच्या भक्तांना चिरस्मरणीय राहतील यांत शंका नाहीं. पहिली गोष्ट ही कीं, बाबांचें वसतिस्थान म्हणजे एक पडकी मोडकी तुडकी मशीद होती. तिचा त्यांनी जिर्णोद्धार केला म्हणजे ती मोडून फिरुन बांधली व मोठी केली. या जिर्णोद्धाराचें काम त्यांनीं नानासाहेब निमोणकराच्या देखरेखीखाली कोंडाजी, गबाजी व तुकाराम या तिघां सुतार बंधुकडून करवून घेतलें. त्यांची दुसरी कामगिरी म्हणजे त्यांनी बाबांच्या कीर्तीचा प्रसार स्वत: व श्री दास गणू महाराज यांचेद्वारा करून मुंबईच्या आजुबाजूच्या लोकांना बाबांच्या सहवासाचा आणि आशीर्वादाचा लाभ करून दिला.

**मशीद उर्फ द्वारकामाई**— बाबा प्रथम शिरडीस आल्यापासून या मशीदींत राहूं लागले. ही मशीद म्हणजे एक लहानसा ओटा अथवा व्हरांडा व त्या पलीकडे एक लहान खोली आहे. बाबा येथें बसत असत आणि त्यांचे समोर एक धुनी अहोरात्र पेटत ठेविलेली असे आणि हल्लींही ती तशीच पेटत ठेविलेली असते. या खोलीचे मध्यभागीं कोपरा किंवा कमान (निंबर) असून तेथें बाबांच्या वेळीं फुलांच्या माळा लाविलेल्या असत आणि बाबा तेथें बसून दुपारच्या आरतीनंतर नैवेद्याचा काला करून सर्वत्रांना वाटीत असत आणि धुनींतील रक्षा - उदी सर्व भक्तांना मशीदीच्या दारांत उभे राहून लावीत असत आणि त्यांना निरोप देत असत. बाबा या मशीदीला नेहमी **द्वारकामाई** म्हणत असत.

हीच आपुली द्वारकामाता। मशीदीचे या अंकीं बैसतां ॥
लेकुरां देई ती निर्भयता। चिंतेची वार्ता नुरेची ॥
एकदां हिचे अंकीं जो बैसला। बेडा तयाचा पार पडला ॥
सावलींत हिचे जो पहुडला। तो आरूढला सुखासनीं ॥

(श्रीसाईसच्चरित. ७ - ४७ - ४९)

असे बाबा हिचे वर्णन करीत. बाबा जे बोलत तें वेदवाक्य होय आणि त्यांनीं म्हटल्याप्रमाणें मशीद ही द्वारका किंवा द्वारकामाई होय यांत शंका नाहीं. 'बाबाचें (देवाचें) बाळ' म्हणजे श्री. बा. वि. देव, राहाणार ठाणें, यांनीं श्रीद्वारकामाई संशोधनांक (वर्ष १४, अंक १, २, ३) प्रसिद्ध केला आहे. त्यांत त्यांनीं शिरडी हें गांव दक्षिण द्वारकेचें केंद्र जें पंढरपूर त्याच्या चतु:सीमेंत येतें म्हणजे शिरडी पंढरपूरचाच - दक्षिण द्वारकेचा एक भाग होता असें अनेक प्रमाणांनीं सिद्ध केलें आहे. हा संशोधनांक बाबांच्या भक्तांनीं व जिज्ञासूंनीं अवश्य वाचावा अशी मी शिफारस करितों. 'शिरडी म्हणजे द्वारकामाई' हें बाबांचें म्हणणें अगदीं योग्य व खरें आहे याचा मला एक छोटासा आधार मिळाला. तो मी येथें देत आहें. श्री. के. नारायण अय्यर यांनीं आपल्या 'भारत वर्षाचा सनातन इतिहास' या इंग्रजी ग्रंथाच्या, व्हाल्युम २ भाग १ पान ९० येथें द्वारकेची व्याख्या स्कंद पुराणांतून उध्दृत केली आहे ती अशी,

चतुर्णामपि वर्गाणां यत्र द्वाराणि, सर्वत:।
अतो द्वारवती त्युक्ता विद्वाद्भिस्तत्त्ववेदिभि: ॥

धर्म, अर्थ, काम, मोक्ष, या चारी पुरुषार्थांना आणि चारही वर्णांना जेथें सर्वत्र द्वारें खुलीं असतात अशा स्थानाला तत्ववेत्ते विद्वान् द्वारका असें म्हणतात. बाबांच्या दरबारांत या चारी पुरुषार्थांचा लाभ चारी वर्णांच्या लोकांनाच नव्हे तर भागोजी शिंदेसारख्या महारोगी, वर्णातीत लोकांना होत असे. तेव्हां बाबांचें निवासस्थान-मशीद **द्वारकामाईच** होय यांत बिलकुल शंका नाहीं.

**बाबांचा यशोदुंदुभि**— नानासाहेबांनी बाबांच्या कीर्तीचा जो प्रसार केला त्या बाबतहि येथें थोडेसें विवेचन करणें योग्य होईल. इष्टमित्रांच्या भेटी झाल्या म्हणजे प्रसंगानुसार योग्य संधि साधून नानासाहेब बाबांचें गुणानुवादन करीत असत आणि श्रोत्यांचे ठायीं बाबांचे दर्शन घ्यावें अशी उत्कट इच्छा उत्पन्न करीत असत. अशांपैकीं कांहीं निवडक वेंचींव उदाहरणें येथें देत आहें.

१ **श्रीसाई लॉज**—नानासाहेबांच्या प्रेरणेनें गुरुवार ता. २८ एप्रिल १९१० रोजीं ज्या मुंबईच्या नवभक्तांना बाबांचें दर्शन झालें त्यांनीं मुंबईत जुन्या हनुमान-गल्लीत रा. ब. मोरेश्वर वि. प्रधान यांच्या घरीं श्रीसांईलॉज स्थापन केला, त्याची हकीगत श्रीसांईलीला वर्ष १३ अंक ४, ५, ६, पान १३-१४ यांत दिलेली आहे. त्यांत त्या नवभक्तांचीं नांवें असून नानासाहेबांनीं त्यांना साई दर्शनाबाबत दिलेली एक सुचना आहे, ती अशी:—पहिल्यानें साठे नवलकर वाड्यांतील श्री निंबाचे वृक्षा-खालील बाबांच्या गुरुच्या समाधीचें दर्शन घेऊन त्यास प्रदक्षणा घालून नंतर श्री बाबांच्या दर्शनास जावें. हल्लींहि दर्शनास जाणाऱ्या मंडळींनीं, प्रथम, निंबवृक्षाखालील समाधीचें दर्शन नंतर मशीदींत बाबांच्या छबीचें (म्हणजे प्रत्यक्ष बाबांचें) दर्शन आणि त्यानंतर वाड्यांतील समाधीचें दर्शन घेण्याची प्रथा ठेविल्यास योग्य होईल.

(२) **काकासाहेब दीक्षित**— कै. हरि सीताराम उर्फ काकासाहेब दीक्षित हे नानासाहेबांचे कॉलेजमधील सहाध्यायी व जुने स्नेही होते. नानांची व त्यांची भेट इ. स. १९०८।०९ चे सुमारास लोणावळयास झाली. तेव्हां आपण विलायतेस असतांना आपला पाय दुखावला, पुष्कळ इलाज करून पाहिले तरी तो बरा होत नाहीं इ. हकीकत काकांनीं नानांना सांगितली तेव्हां—

“ तो पायाचा लंगडेपणा । निःशेष जात्रा येतें का मना ? ॥
चला माझे गुरूचे दर्शना । ऐसें तव नाना वदले तयां ॥ ”

(श्रीसांईसच्चरित ५१ - २६.)

त्यानंतर काकांनी शिरडी कोठें आहे वगैरे माहिती घेऊन दर्शनास जाण्याचें कबूल केलें आणि पुढें दर्शनहि घेतलें. याविषयीं हकीकत पुढें योग्य प्रसंगी देण्यांत येईल.

(३) **बाबांचें बाळ**— (श्री. बा. वि. देव ) नानासाहेबांची व यांची गांठ १९१० सालीं पडली. यांना नानासाहेबांनीं प्रत्यक्ष अनुभवाच्या अति गोड सुरस बोधप्रद अशा बाबांच्या कथा व लीला सांगितल्या. त्यानंतर श्रीदेव शिरडीस जाऊन बाबांचें दर्शन घेऊन कृतार्थ झाले इत्यादि सविस्तर हकीकत त्यानी श्रीसाईलीला वर्ष ३, अंक ६ यांत दिलेली आहे. आणि नानासाहेबांनीं त्याना सांगितलेले अनुभवहि अनेक अंकात प्रसिद्ध केलेले आहेत. वर्ष १६ अंक १-२-३ यांत त्यांनीं नानासाहेबाचें संक्षिप्त चरित्र दिलेलें आहे. या सर्व अंकाचा हा लेख लिहिण्याचे कामीं फार उपयोग झाला आहे आणि त्याबद्दल मी श्री देव यांचें मनःपूर्वक आभार मानीत आहे.

( ४ ) **श्री. तात्यासाहेब नूलकर**—हे १९०९ सालीं पंढरपुरास मुनसब होते आणि नाना तेथेंच मामलेदार होते. दोघांच्या वरचेवर गांठी पडत असत आणि संभाषण होत असे. तात्यासाहेबांचा संतावर विश्वास नसे, तर नानासाहेब पक्के संत प्रेमी. नानासाहेब नेहमीं त्यांना बाबांच्या गोष्टी सांगत व शिरडीस केव्हां निघतां असें म्हणें त्यांच्या मागें लावीत असत. शेवटीं तात्यासाहेब शिरडीस जाणेस कबूल झाले. पण ते दोन अटीवर. ( १ ) त्यांना एक ब्राह्मण स्वयंपाकी हवा होता ( २ ) उत्तम नागपूरची संत्री बरोबर न्यावयास हवीं होतीं. या दोन्ही अटी अकल्पित रीतीनें पूर्ण झाल्या. एक ब्राह्मण नोकरीसाठीं नानासाहेबाकडे आला, तो त्यांनीं तात्यासाहेबाकडे पाठविला. तसेंच पंढरपूरांत उत्तम संत्रे मिळत नाही, पण दुसरे दिवशीं प्रातःकाळीं त्यांचें भव्य पार्सल आलेलें मिळालें. उघडून पहातात तो त्यांत उत्तम शंभर संत्रे! अशा रितीनें अटी पुऱ्या झाल्यावर ते नानासाहेबाबरोबर शिरडीस गेले आणि बाबांचें दर्शन घेते झाले. बाबा प्रथम त्यांचेवर रागावले पण लगेच त्यांनीं त्यांचेवर कृपा करून त्यांना असें उत्तम अनुभव प्राप्त करून दिले कीं, बाबा हे देवाधिदेव आहेत अशी त्यांची खात्री झाली. शेवटी ते तेथेंच रंगले आणि रमलेव त्यांनीं आपला देह शिरडीसच ठेविला. अंतःकाळीं त्यांना बाबांचें चरणतीर्थ मध्यरात्रींस मिळून त्यांना उत्तम गति प्राप्त झाली. बाबांना त्यांच्या निधनाची वार्ता कळतांच ते तेथें आले आणि म्हणाले कीं — ' अरे तात्यांनीं आघाडी मारली. त्यानें जन्माचें सार्थक केलें. "

(५) **हेमाडपंत** ( श्री. अण्णासाहेब दाभोळकर) नानासाहेबांनीं यांना शिरडीस बाबांच्या दर्शनास जाण्यास कसें प्रवृत्त केलें याविषयीं श्रीसाईलीला, वर्ष १८ अंक १-२-३. यांत - श्रीसांईगाथामृत प्रकरण २ रें पान ६ येथें वर्णन आलेलें आहे याविषयीं श्रीसाईलीला. वर्ष १३, अंक ४,५,६. या अंकात पान १६ येथें "नाना" या शब्दावर **श्री. सुमनसुंदर** यांनीं मार्मिक व सुंदर विवेचन केलें आहे. तें असें– 'नाना' हा नाहीं नाहीं म्हणजे 'नेति नेति' याचा अपभ्रंशहि होऊं शकेल. व **विवेक** हेंच कार्य करतो; सत् असत् यांतील भेद विशद करून **विवेक** 'सत्'चें अद्वैत पटवितो भासतें तसें नसतें' हें त्याचें संकलित कार्य होय. मायेचा फोलपणा दाखवून तो परमात्म्याची खरी जाणीव करून देतो. 'नाना'ची भूमिका अशीच आहे.

" केव्हां निवणार साई दर्शना । किमर्थ आळस शिरडी गमना ॥
दीर्घसूत्रता कां प्रस्थाना । निश्चिंती मना कां नाहीं ? ॥ "

श्रीसाईसच्चरित. २–११९

हें ( नानाचें वचन ) त्याचेंच द्योतक आहे. विवेक मनाला अशीच टोंचणी देऊन मोक्षाकडे खेंचतो:-साई परमात्म्याच्या दर्शनास केव्हां निघणार ? तुम्हाला जिज्ञासा केव्हां होणार ? शिरडी परब्रम्ह गमनास–आत्मज्ञानरूपि मोक्ष मिळवण्यास आळस मनाची चलबिचलता हीं उपयोगीं नाहींत. आळस मनाचें चांचल्य हे मायेचे विकार आहेत, ज्याला आत्मज्ञान पाहिजे असेल, त्यानें ह्यांचा त्याग केला पाहिजे. विकारी वृत्ति सोडून विचारी बनलें पाहिजे. असा त्याचा भावार्थ आहे व हेमाडपंताच्या मिषानें आपणा सर्वांस विवेकानें ( नानानें ) जागें केलें आहे व आत्मोन्मुख बनविलें आहे.

( ६ ) **श्री दास गणू महाराज** श्री. गणपतराव सहस्रबुद्धे ( दास गणू महाराज ) हे नानाच्या वेळीं नगर येथें पोलीस खात्यांत कारकून होते. त्याना कविता विशेषतः लावण्या करण्याचा फार नाद होता. नाना साहेबांनीं त्यांचें मन वळवून कीर्तनें करून बाबाची प्रसिद्धी करण्याकडे प्रवृत्त केलें. त्यांचे घरीं दामु अण्णा आठवले म्हणून एक गोड आवाजाचा मुलगा होता. त्याला त्यांनीं कीर्तनांत साथीदार म्हणून श्री दास गणूकडे दिले. या जोडीमुळें कीर्तनास रंग चढून बाबांची प्रसिद्धी मुंबई-पुणेंच्या आजुबाजूस बरीच झाली. आणि तेथुन बाबांच्या दर्शनास लोक भराभर जाऊं लागले आणि शिरडी हें क्षेत्र बनलें. याचें श्रेय नाना साहेबास आहे.

**आधुनिक नानासाहेब.** येथें आम्हांस नमूद करणेंस आनंद वाटतो कीं, नानासाहेबांनीं आपल्या हयातींत जें ( प्रसिद्धीचें ) काम केलें तें काम अलीकडे मद्रासचे आमचे मित्र श्री. बी. व्ही. नरसिंहस्वामी अय्यर हे मोठ्या उत्सुकतेनें व उल्हासानें करीत आहेत. त्यांनीं श्री साईबाबांच्या अनेक भक्तांच्या भेटी घेतल्या, त्यांचे अनुभव टिपून घेतले आणि त्यांना इंग्रजी पेहराव चढवून त्यांनीं त्यापैकीं कांहीं मद्रासच्या ' संडे टाईम्स ' या साप्ताहिकांत वेळोवेळीं देऊन पुढें त्यांचा एका इंग्रजी ग्रंथांत समावेश करून तो ग्रंथ Introduction to Shri Sai Baba and Devotees' Experiences " या नांवानें प्रसिद्ध केला. त्याच्या दोन आवृत्त्या निघाल्या असून पुढील आवृत्त्याहि लवकरच निघतील. तसेच त्यांनी "Shri Sai Sudha" या नांवाचें एक मासिक पुस्तक सुरू केले आहे. या योगानें मद्रास इलाख्यांत बाबांची प्रसिद्धि विशेष झाली आहे आणि आतां श्री. स्वामींनीं हिंदुस्थानभर दौरा काढून बाबांविषयीं व्याख्यानें देण्याचें सुरू केलें आहे. यावरून असें वाटतें कीं, बाबांचा यशोदुंदुभि हिंदुस्थानांतच नव्हे तर हिंदुस्थानाबाहेरहि अखिल जगभर पसरेल आणि बाबांचें खरें व्यापक स्वरुप जगाला समजूं लागेल. नाना गेले खरे पण नानांचे कार्य अव्याहतपणें आणि विस्तृत रीतीनें चालविण्यासाठीं बाबानीं दुसरे **मोठे नाना, नरसिंह स्वामी** पैदा केले आहेत आणि त्यांचे काम यशस्वी रीतीनें पार पाडवून घेणेंस श्रीबाबा समर्थ आहेत.

आतां नानासाहेबांचें अति संक्षिप्त चरित्र देऊन त्यांत आलेले कांहीं अनुभव सांगू.

**चरित्र** ( श्रीसाईलीला -व० १६ -अं. १-२-३ ) नानासाहेबांचा जन्म ठाणें येथें १८६० सालीं झाला. त्यांचें वडीलांचें नांव गोविंदपंत नाना उर्फ नानासाहेब. ते डेप्युटी कलेक्टर व कलेक्टरचे पर्सनल असिस्टंट होते. त्यांना दप्तरदार ही पदवी मिळाली होती. कल्याणास त्यांचे वाड्यास दप्तरदारांचा वाडा असे म्हणतात. ते सुशील सदाचारी होते आणि त्यांचा दानधर्म बराच असे. त्यांना ठाणें जिल्ह्यांतील भिवंडी तालुक्यांतील कवाडक्षेत्रनिवासी श्रीसखाराम महाराज यांचा अनुग्रह मिळाला होता. हे सखाराम महाराज आणि बाबा गुरुबंधु होते असें सांगतात. नानांचे मराठी शिक्षण कल्याण येथें व पुढील इंग्रजी शिक्षण एल्फिन्स्टन हायस्कुलांत व एलफिन्स्टन कॉलेजांत झाले. ते १८८३ सालीं बी. ए. झाले. संस्कृत हा त्यांचा ऐच्छिक व आवडीचा विषय होता आणि तो त्यांनीं आमरणांत कायम ठेविला. त्यांचा विवाह १८७८ सालीं कल्याण येथें पनवेल तालुक्यांतील पळस्पें गांवच्या विनायक सदाशिव उर्फ काका

साहेब ओझे या श्रीमान् गृहस्थाच्या कन्येशी झाला. त्यांच्या पत्नी सौ. राधाबाई यांचेपासून त्यांना दोन चिरंजीव (पुत्र) व दोन कन्या झाल्या. थोरले चिरंजीव वासुदेव उर्फ बाबुराव हे ग्रॅजुएट असोन विलेपारलें येथील खासगी हायस्कुलांत गणित शिक्षक आहेत. धाकटे चिरंजीव महादेव उर्फ बापुराव हे शेतकी शिक्षण घेऊन घरींच शेतीभाती करून आहेत. वासुदेवरावाचा विवाह ग्वाल्हेरचे सुप्रसिद्ध जहागिरदार श्री. रामराव कृष्ण जठार यांची कन्या इंदिराबाई यांचेशी झालेला आहे आणि बापुरावाचा विवाह धारवाडचे वकील श्री. त्रिविक्रम काशिनाथ पित्रे यांच्या कन्या गिरिजाबाई यांच्याशी झालेला आहे. वडील कन्या मैनाताई यांना पुण्यास कुवळेकर यांचे घरीं दिलें आहे व कनिष्ठ कन्या द्वारकाबाई यांना सातारचे पेंढरकर यांचे घरीं दिलें आहे.

नानासाहेब बी. ए. झाल्यावर त्यांची नेमणूक प्रथम संगमनेर येथें मामलेदार कचेरींत कारकुनीचे जागीं झाली. नंतर त्यांना नगर जिल्ह्यांत कोपरगांव येथें अव्वल कारकुनाची जागा मिळाली. १८९२ सालीं ते नगर येथें कलेक्टर साहेबांचे चिटणीस झाले (ह्याचवेळीं त्यांना बाबांचें दर्शन झालें.) १८९३ सालीं पुणें जिल्ह्यांत घोडनदी तालुक्याचे मामलतदाराची जागा त्यांना मिळाली. पुढें १८९४ ते १९०१ पर्यंत ते पुनः नगर जिल्ह्याचे चिटणीस होते. सन १९०२ सालीं ते खानदेशांत जामनेर तालुक्याचे मामलतदार होते. (त्यावेळीं त्यांना बाबांनीं आपली अलौकिक शक्ति दाखवून त्यांच्या मुलीची-सौ. मैनाताईची प्रसुति-सुटका केली ) नंतर त्यांची बदली नंदुरबार, पंढरपूर वगैरे ठिकाणी मामलतदार म्हणून झाली. सन १९०८ साली ते पुणें येथें डि. डे. कलेक्टर झाले. सन १९०९ साली याच जागेवर त्यांची बदली ठाण्यास झाली इ. स. १९१५ सालीं ते सेवानिवृत्त झाले. त्यानंतर सहा वर्षांनी म्हणजे १९२१ साली त्यांनीं आपला नश्वर देह पुणें येथें श्री बाबांचे चरणी ठेविला.

**बाबांचे प्रथम दर्शन.** (श्री साईलीला व. ३. अं. ३.) नानासाहेब नगर जिल्ह्यांत कलेक्टरचे चिटणीस असतांना शिरडीचे आप्पा कुलकर्णी नगरास जमाबंदीच्या कामाकरितां बाबांची आज्ञा घेऊन निघाले. कलेक्टरचे चिटणीस कोण आहेत याची चौकशी करून, बाबानी तुला बोलाविलें आहे असा निरोप आप्पा कुलकर्ण्यांमार्फत त्यांनीं नानास पाठविला. आपण येत नाहीं असा नानानीं जबाब दिला. बाबानीं तोच निरोप पुनः अप्पा कुलकर्ण्यांमार्फत पाठविला. पुनः नानांचा नकार आला. असें दोनतीन वेळा झाल्यावर नानांनीं भेटीस येण्याचे कबूल केलें. पण त्यांचे मनांत शंका कुशंकाचे काहूर ऊठलें. आपण एखाद्या फकीराच्या भेटीस जाणार कीं खऱ्या

संताच्या भेटीस जाणार याचा त्यांचे मनांत निश्चय होईना. शेवटी आपल्या पत्नीकडून गाठोड्यांत बांधून ठेविलेला एक जुना अल्पाकचा कोट मागून घेऊन तो घालून ते बाबांच्या दर्शनास आले. रिक्तहस्तें साधुसंत दर्शनास जाऊ नये, तशांत शिरडी हें खेडेगांव असल्यामुळें तेथें कांहींच मिळणार नाहीं अशा विवंचनेंत तें असतां त्यांचा हात सहज त्या कोटाच्या खिशांत गेला. त्यांत त्यांना एक लहानशी पुडी मिळाली. ती उघडून पहातां त्यांत २१४ बदाम व २१४ खडीसाखरेचे तुकडे मिळाले. याचें नानासाहेबांस सकौतुक आश्चर्य वाटले. आपण रिक्तहस्ते बाबाकडे जात नाहीं, बाबा हे साधु असावेत असें त्यांना वाटून ते बाबांकडे गेले आणि त्यांना साष्टांग प्रणिपात करून समोर बसले आणि आपणांस कां बोलाविलें असें विचारलें. अरे जगांत काय थोडी माणसे आहेत, त्यांना न बोलावितां तुलाच कां बोलावतो याचें कांहीं तरी कारण असेलच कीं नाहीं असें बाबानीं उत्तर दिलें. त्यावर नाना म्हणाले तें कारग सांगा. बाबा म्हणाले–तुझा व माझा चार जन्माचा संबंध आहे, तुला तो माहीत नाहीं, मला माहीत आहे म्हणूनच तुला मी बोलावितो. सवडीनुसार पुनः येथें येत जा. त्यावर नाना म्हणाले-बरें आहे येत जाईन.

**प्लेगची लस टोंचून घेणें** ( श्री साईलीला, व. ३. अं. ३.) इतकें झालें तरी नानासाहेबाचा बाबांवर विश्वास बसेना. पुढें कांहीं दिवसांनी नगरच्या आजुबाजूस प्लेगाची सांथ सुरू झाली. त्यावेळीं कलेक्टर साहेबांनी नानासाहेबाला सांगितलें कीं, तुम्ही प्रथम प्लेगची लस टोंचून घेऊन उदाहरण घालून द्या, म्हणजे इतर सर्व लोक तुमचें अनुकरण करितील. नानासाहेब फार पेंचांत पडले. त्यावेळीं लसीचा तोडगा प्रयोगावस्थेंत आणि धोक्याचा होता अशी सर्वांची समजूत होती. तेव्हां आतां काय करावें हें त्यांना सुचेना. विचार करितां करितां त्याना एक युक्ति सुचली. याविषयीं बाबांना विचारून त्यांचें मत घ्यावें आणि ते सांगतील तसें करावें. विचार करणेंसाठीं म्हणून त्यांनीं कलेक्टरसाहेबाकडून एक आठवड्याची मुदत मागून घेतली आणि त्या मुदतींत एक दिवस शिरडीस येऊन सर्व हकिकत बाबांना निवेदन केली आणि विचारलें कीं, प्लेगची लस टोंचून घ्यावी की घेऊं नये. बाबा म्हणाले, अं: त्यांत काय आहे, टोंचून घे भिऊं नको, त्यापासून कांहीं होणार नाहीं. त्यानंतर नानासाहेब परत नगरास आले आणि टोंचून घेण्याचें आपण ठरविलें आहे असें कलेक्टर साहेबाना सांगून त्यांनीं टोंचून घेतलें. पुढें त्यांचें ऑफिसांतील सर्व मंडळीनीहि टोंचून घेतलें. टोंचून घेतलेल्यापैकी कोणावरहि वाईट परिणाम झाला नाहीं. यामुळें नानासाहेबांची बाबावर

श्रद्धा जडत चालली आणि यांच्यांत कांहीं विशेष तेज आहे, व त्यांचेकडे आपण वरचेवर जावें असें त्यांना वाटूं लागलें.

**हरिश्चंद्र डोंगर ट्रीप** (श्रीसाईलीला व. ३ –अं.–३ ) नानासाहेब नगर जिल्ह्यांत चिटणीस असतांना एकदां हरिश्चंद्र डोंगरावर जाण्याचा त्यांनीं बेत ठरविला त्यांचे ऑफिसांतील मंडळीस त्यांनीं हा बेत कळवितांच, बाबा खरवंडीकर नामक ऑफिसांतील माहितगार विनयशील स्पष्टवक्ते कारकुनानें स्पष्ट सांगितलें कीं, उन्हाचे दिवस, वाट उंच व अवघड, वाटेंत पाण्याचा थेंबहि मिळणार नाहीं, करितां तूर्त हा बेत रहित करावा. नानासाहेबांना हें म्हणणें पटलें नाहीं. तेव्हां सर्वांनी डोंगरावर जाण्याची तयारी केली आणि पर्वत चढण्यास आरंभ केला अर्धा रस्ता गेल्यावर नानासाहेब थकले आणि तहानेनें व्याकुळ झाले आणि बाबा खरवंडीकरांना म्हणाले कीं, कसें हि करा, मला पाणी पिण्यास द्या. त्याशिवाय मला पुढें पाऊल टाकवत नाहीं— बाबा म्हणाले कीं, आपणास मी पूर्वींच बजाविले होतें; आतां आपण अर्धी वाट आलों, येथें पाण्याचा मागमूस नाहीं आणि कोणी वाटाड्याहि दिसत नाहीं. तेव्हां पाणी मिळावें कसें? यानें नानासाहेबाचे कांहीं समाधान झालें नाहीं. पुढें मार्ग आक्रमण करण्यास किंवा मागें परतण्यासहि ते तयार होईनात. या स्थितींत त्यांनीं श्रीबाबांचे स्मरण केलें आणि त्यांचा धांवा केला. इतक्यांत त्या वाटेनें एक भिल्ल डोक्यावर लांकडाची मोळी घेऊन जातांना त्यांचे दृष्टिस पडला. नानासाहेबांनीं सहज त्याला, येथें जवळपास पिण्यास थोडें पाणी मिळेल काय असें विचारलें. तुम्ही बसलां त्या दगडाखालींच पाणी आहे असें सांगून तो भिल्ल आपल्या वाटेनें निघून गेला. नंतर मंडळींनीं दगड वर उचलून पाहिलें तों काय चमत्कार सांगावा, त्यांची तहान भागण्यापुरतें स्वच्छ मधुर पाणी त्यांना मिळालें. नानासाहेब तें पाणी प्याले आणि शांत झाले. सर्व मंडळींना हा मोठा चमत्कार वाटला. भिल्लाचा तपास करतां तो कोठें दिसेना. तेव्हां नाना म्हणाले पहा माझे बाबा कसे आहेत, त्यांनीं मला येथेंच बसल्या जागीं पाणी दिलें कीं नाहीं? बाबांवरील नानासाहेबांची निष्ठा पाहून, बाबा जरी शिरडींत असलें तरी ते सर्वव्यापी, भक्तवत्सल असून भक्तांची संकटें दूर करितात अशी सर्व मंडळींची खात्री झाली. नंतर सर्व मंडळी हरिश्चंद्राचे माथ्यावर जाऊन सायंकाळीं परत नगरास आली.